सकाळ दिनांक :- 23/02/2021

# ७९ बुलेटसह १३९ दुचाकी जप्त

## वाहतूक शाखेची कारवाई; पाच लाखाचा दंड वसुल

**नांदेड, ता. २२ (बातमीदार) : बुलेटच्या मुळ सायलेन्सरमध्ये बदल करुन कर्णकर्कश आवाज काढणारे सायलन्सर बसवून शहरातून बुलेट चालविणाऱ्यांवर पुन्हा संकट ओढावले आहे. शिवजयंतीच्या. निमित्ताने बुलेटसवारच्या नियोजनावर वाहतुक शाखेने कारवाई केली आहे. आजपर्यंत ७९ बुलेटसह एकुण १३९ दुचाकी जप्त केल्या. आता या दुचाक्यावर दंडात्मक कारवाई करण्यासाठी प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे अधिकारी सोमवारी (ता. २२) वाहतूक शाखेत दाखल झाले आहेत.**



**नांदेड : प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे कर्मचारी आणि वाहतुक शाखेच्या कर्मचाऱ्यांनी बुलेटसह इतर दुचाकी जप्त केल्या आहेत.**

. शहरातील रस्त्यावरुन कर्णकर्कश आवाज काढत धूम ठोकणे, फॅन्सी नंबर प्लेट बसविणे, फटाक्याचे आवाज काढणे अशा दुचाकींवर वाहतूक शाखेचे पोलिस निरीक्षक चंद्रशेखर कदम यांच्यासह वाहतूक शाखेच्या अधिकारी, कर्मचारी यांनी कारवाई करण्यास सुरूवात केली. रविवारपर्यंत (ता. १४) ७९ बुलेट व ६० दुचाकी अशा एकुण १३९ दुचाकी ताब्यात घेतल्या असून त्यांच्याकडून पाच लाखाचा दंडही वसुल करण्यात आला आहे.

### चालकांनो परवाना जवळ ठेवा

**शिवजयंतीच्या मिरवणुकीतील दुचाकी चालकांनी पोलिस दिसताच आपल्या दुचाकी अन्य रस्त्याने पळविल्या. बेसावध असलेल्या काही दुचाकी पोलिसांच्या तावडीत सापडल्या. त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. लवकरच आता फॅन्सी नंबर प्लेट, काळी फिल्म आणि विनापरवानगी वाहतुक यावर कडक कारवाई करण्यात येणार आहे.**

**- चंद्रशेखर कदम,**
पोलिस निरीक्षक, वाहतुक शाखा, नांदेड.